**विशेष खटला नं. १२८/२०२४**
**म. सरकार वि. हर्षाली देविदास सोनवणे**
**नि. क्र. १९.**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा पुरावा</u>**

मी शपथेवर सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| नांव | – | विक्रांत मच्छींद्र लांडगे |
| वय | – | २६ वर्षे, |
| व्यवसाय | – | नोकरी. |
| राहणार | – | श्रीराम चौक, पाईपलाईन रोड, जि. अहिल्यानगर. |

**<u>सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जी. के. मुसळे यांच्यामार्फत सरतपास सुरु.</u>**

१. मी सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये १४/३/२०२४ पासून स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक म्हणून कार्यरत आहे. माझ्या कार्यालयाची वेळ १० ते ५ आहे. दिनांक ५/४/२०२४ ला मी ऑफिसमध्ये कार्यरत होतो. त्यावेळेस आमच्या वरिष्ठांना पोलीसांकडून दोन पंच मिळणेसाठी फोन आला. आमच्या वरिष्ठांनी त्याप्रमाणे आम्हाला पत्र दिले. पत्र घेवून आम्हाला अमोल भारती उपविभागीय अधिकारी यांना भेटण्यास सांगितले. आम्ही त्यांना भेटलो. आम्ही त्यांना पत्र व आमचे ओळखपत्र दाखविले. त्यांनी आम्हाला सांगितले की, आम्हाला पंचनाम्यासाठी जायचे आहे. त्यांनी आम्हाला तुम्ही तयार आहेत का असे विचारले व आम्ही हो असे सांगितले.

२. आम्ही दोन पंच, दोन पोलीस व अमोल भारती यांच्या सोबत सरकारी गाडीने घटनास्थळी गेलो. आम्ही शिवाजीनगर येथे नगर कल्याण रोडला गेलो. तिथे आम्हाला वयोवृध्द इसम परदेशी यांनी आम्हाला घटनास्थळ दाखविले. सदरचे घटनास्थळ हे परदेशी यांच्या घरापासून ५ ते ६ फुट अंतरावर होते. आम्ही घटनास्थळ पाहिले. नंतर आम्ही घरामध्ये गेलो. त्यांनी आम्हाला स्वयंपाक घर दाखविले जिथे त्यांना मारले होते. त्यानंतर त्यांनी आम्हाला लोखंडी जिन्याने घराच्या वरच्या मजल्यावर नेले. तिथे एक गॅलरी होती. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मारहाणीची घटना घडली होती. वस्तुस्थितीप्रमाणे पंचनामा केला. घटनास्थळाचा पोलीसांनी कच्चा नकाशा तयार केला. मला आता तो पंचनामा दाखविला तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २०** देण्यात येत आहे. घटनास्थळी ३ फोटो काढले. आता मला ते तीन फोटो दाखविले. ते तेच आहे. त्यात मी,

२...

अमोल भारती साहेब, परदेशी व अन्य पंच दिसत आहेत. ते तेच फोटो आहेत. त्यास एकत्रीतरित्या **आर्टिकल ए १ ते ३** देण्यात येत आहे. आम्ही परत एस. पी. ऑफिसला आलो. त्यानंतर त्यांनी आम्हाला जाण्यास सांगितले.

सरतपास संपला.

३. **निं. २१ खाली दिलेल्या मुदतीनुसार उलटतपास दिनांक १३/७/२०२६ रोजी पर्यंत तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.

दि. १०/०७/२०२६

समक्ष

**(एम. एस. भदाने)**
**तदर्थ जिल्हा न्यायाधीश, व अति. सत्र न्यायाधीश, अहमदनगर.**